दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. ७ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १६२ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

शनिवार दि. ७ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, कृष्णपक्ष, चतुर्थी संध्याकाळी ७-१८ पर्यंत.
दिवस नक्षत्र– चित्रा सकाळी ११-१६ पर्यंत नंतर स्वाती,
योग– ध्रुव अहोरात्र
चंद्र रास- तुला, सूर्य रास = कुंभ,
गुरु रास= मिथुन

### दहशतवादाविरोधात कारवाई

**मुंबई** : महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने मोठी कारवाई करत मुंबईत कार्यरत असलेल्या ऑनलाइन दहशतवादी नेटवर्कचा पर्दाफाश केला असून अभियांत्रिकी शाखेचा विद्यार्थी अयान शेख याला अटक केली आहे. तपासात धक्कादायक माहिती समोर आली असून तो गेल्या सहा महिन्यांपासून पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मद साठी स्लीपर सेल म्हणून काम करत असल्याचे उघड झाले आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस यांचा सर्वसमावेशक अर्थसंकल्प!

## शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी; लाडकी बहीण योजना कायम; ७ लाख ६९ हजार ४६७ कोटींचा अर्थसंकल्प

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांसाठी २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर केली. तसेच 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना कायम ठेवत तिच्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आल्याची घोषणा त्यांनी केली. सन २०२६-२७ साठी सादर करण्यात आलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पाचे एकूण आकारमान ७ लाख ६९ हजार ४६७ कोटी रुपये इतके आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अनुपस्थितीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत अर्थसंकल्प सादर केला, तर विधान परिषदेत अर्थराज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी अर्थसंकल्प मांडला. मुख्यमंत्री फडणवीस हे यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांच्यानंतर मुख्यमंत्री म्हणून अर्थसंकल्प सादर करणारे राज्यातील तिसरे मुख्यमंत्री ठरले. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, निवडणुकीत दिलेल्या आश्वासनानुसार राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर करण्यात येत आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येईल. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे.

कर्जमाफीसोबतच शेतकऱ्यांना कायमस्वरूपी कर्जमुक्त करण्यासाठी बँकिंग व्यवस्था अधिक सक्षम करण्याचे पाऊल उचलण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. जून ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राज्यातील शेतकऱ्यांना १५ हजार ४९२ कोटी रुपये वितरित करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. तसेच शेतीमालाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी निर्माण करण्याची घोषणा करण्यात आली.



कृषी क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यावरही सरकारने भर दिला आहे. ॲग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी आणि को-ऑप स्टॅक या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून एकात्मिक कृषी इकोसिस्टीम उभारली जाणार आहे. शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढवण्यासाठी महाविस्तार एआय, वसुधा व्हॉईस टेलिफोनी, पुश टेलिफोनी, महाराष्ट्र ॲग्रीकल्चर डेटा एक्सचेंज आणि एआय सक्षम सँडबॉक्स यांसारखे उपक्रम सुरू करण्यात आले आहेत.

कृषी क्षेत्रातील भांडवली गुंतवणूक वाढवण्यासाठी पुढील चार वर्षांत विशेष उपक्रम राबवण्यात येणार असून राज्यातील चार कृषी विद्यापीठांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स इनोव्हेशन अँड इन्क्युबेटर सेंटर स्थापन करण्यात येणार आहेत. यामुळे कृषी स्टार्टअपना प्रोत्साहन मिळेल आणि उत्पादन खर्चात सुमारे २५ टक्के घट होऊन उत्पादकता वाढीस चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

राज्यातील शेतकऱ्यांची डिजिटल ओळख मजबूत करण्यासाठी जानेवारी २०२६ पर्यंत १ कोटी ३१ लाख फार्मर्स आयडी तयार करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. यामध्ये आदिवासी वनपट्टेधारक शेतकऱ्यांचाही समावेश करण्यात येणार आहे. तसेच नवीन प्राकृतिक शेती अभियानांतर्गत ५ लाख हेक्टर क्षेत्र प्राकृतिक शेतीखाली आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

महिलांसाठी सुरू असलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना बंद होणार असल्याच्या अफवा निवडणुकीदरम्यान पसरवण्यात आल्या होत्या. मात्र ही योजना कायम राहणार असून तिच्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले असून त्याच्या आधारे लवकरच स्वतंत्र धोरण जाहीर केले जाणार आहे. महिला सक्षमीकरणासाठी राज्यात आतापर्यंत २७ लाख 'लखपती दिदी' तयार झाल्या असून २०२६-२७ या वर्षात आणखी २५ लाख महिलांना लखपती बनवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याशिवाय महिला बचतगटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी १३ जिल्ह्यांत 'उमेद मॉल' उभारण्यात येणार आहेत. अंगणवाडी सेविकांना आर्थिक नियोजनाचे प्रशिक्षण देण्यात येणार असून लाभार्थ्यांना आर्थिक साक्षरता, गुंतवणूक आणि लाभ व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले जाणार असल्याचेही जाहीर करण्यात आले.

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत राज्याचा २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर करताना कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. राज्याची अर्थव्यवस्था सुमारे ७.९ टक्क्यांच्या वेगाने वाढत असल्याचे नमूद करत त्यांनी शेतकरी आणि शेतमजुरांच्या संरक्षणासाठी नवीन उपाययोजना जाहीर केल्या. यामध्ये शेतकरी व शेतमजुरांना आर्थिक संरक्षण देण्यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सुरू करण्याची घोषणा करण्यात आली.

या योजनेच्या माध्यमातून शेतात काम करताना दुर्घटना घडल्यास किंवा अपघातामुळे जखमी होऊन उपचाराची गरज भासल्यास पात्र शेतकरी तसेच शेतमजुरांना आर्थिक मदत मिळणार आहे. शेतीकाम करताना होणाऱ्या अपघातांचा धोका लक्षात घेऊन ग्रामीण कुटुंबांना आर्थिक आधार देण्याच्या उद्देशाने ही योजना राबवली जाणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

या योजनेमुळे अपघाताच्या प्रसंगी शेतकरी कुटुंबांवरील आर्थिक ताण कमी होण्यास मदत होईल आणि ग्रामीण समाजाला सुरक्षिततेची हमी मिळेल, असेही त्यांनी सांगितले. कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावी वापर करण्यावरही सरकार भर देत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. राज्यातील सुमारे ३० लाख शेतकऱ्यांना महाविस्तार या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणालीच्या माध्यमातून शेतीसंबंधित तांत्रिक माहिती, हवामान अंदाज, पीक व्यवस्थापन आणि बाजारभाव याबाबतची माहिती त्वरित उपलब्ध करून दिली जाणार आहे. या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेतकऱ्यांना योग्य वेळी योग्य निर्णय घेणे सुलभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. ज्यांच्याकडे स्मार्टफोन नाहीत अशा शेतकऱ्यांसाठी 'वसुधा' ही विशेष संदेश सेवा सुरू करण्यात येणार आहे. या सेवेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीसंबंधित मार्गदर्शन, हवामान माहिती तसेच विविध शासकीय योजनांची माहिती थेट त्यांच्या मोबाईलवर संदेशाद्वारे पाठवली जाणार आहे. त्यामुळे डिजिटल सुविधांपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांपर्यंतही शासनाच्या योजना पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## पायाभूत सुविधांच्या विकासावर मोठा भर

# मेट्रो, महामार्ग आणि विमानतळ प्रकल्पांना चालना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : राज्याच्या सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांच्या विकासावर मोठा भर देण्यात आला असून मेट्रो, महामार्ग, सागरी सेतू, भुयारी मार्ग आणि विमानतळ विस्तारासाठी महत्त्वाकांक्षी प्रकल्प जाहीर करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत अर्थसंकल्प सादर करताना राज्यातील वाहतूक आणि कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यासाठी अनेक मोठ्या योजना जाहीर केल्या.

पुणे शहरासाठी पुणे मेट्रो च्या दुसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात आली असून खडकवासला – स्वारगेट – हडपसर – लोणी काळभोर हा मार्ग विकसित करण्यात येणार आहे. तसेच पुणे ते शिरूर दरम्यान ५३ किमीचा उन्नत मार्ग उभारण्याची योजना जाहीर करण्यात आली आहे.

विमानतळ विकासाच्या दृष्टीने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी निधी देण्यात येणार असून पुरंदर विमानतळ उभारणीसाठीही विशेष निधीची तरतूद करण्यात येणार आहे. राज्यातील इतर विमानतळांच्या विस्तारासाठीही निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा करण्यात आली.

राज्यातील वाहतूक जाळे मोठ्या प्रमाणात वाढवण्याचे उद्दिष्टही सरकारने जाहीर केले आहे. राज्यातील मेट्रो नेटवर्क १ हजार २०० किमीपर्यंत नेण्याचा



तर द्रुतगती मार्गांचे जाळे ६ हजार किमीपर्यंत विस्तारण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. या अंतर्गत कल्याण ते लातूर आणि शिरूर ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान नवीन ग्रीनफिल्ड महामार्ग उभारले जाणार आहेत.

मुंबई महानगर प्रदेशातही अनेक महत्त्वाचे प्रकल्प जाहीर करण्यात आले आहेत. उत्तन ते विरार दरम्यान सागरी सेतू उभारून त्याद्वारे मुंबईला वाढवण बंदर प्रकल्पाशी जोडण्याची योजना आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ५८ हजार ७५४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. तसेच बाळकुम ते गायमुख आणि उलवे किनारी मार्ग विकसित करण्यात येणार आहेत.

अटल सेतू ला मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग यांच्याशी जोडण्याची योजना जाहीर करण्यात आली आहे. मुंबईत वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ऑरेंज गेट (पूर्व मुक्त मार्ग) ते मरीन ड्राईव्ह, गोरेगाव–मुलुंड, ठाणे–बोरीवली आणि खारघर–तुर्भे दरम्यान भुयारी मार्ग उभारले जाणार आहेत. तसेच गायमुख जंक्शन ते फाऊंटेन हॉटेल ते भाईंदर या भागात ६ आणि ९ किमी लांबीचे मार्ग विकसित केले जाणार आहेत. वांद्रे–वरळी सागरी सेतूला बीकेसी येथील हायस्पीड रेल्वे स्थानक आणि मुंबई विमानतळाशी जोडण्याचाही प्रस्ताव आहे.

ग्रामीण भागातील रस्ते विकासालाही अर्थसंकल्पात मोठा निधी देण्यात आला आहे. महाराष्ट्र अमृतकाल योजनेअंतर्गत ६ हजार २७२ किमी द्रुतगती मार्ग आणि १४ हजार ९१९ किमी राज्य व जिल्हा मार्ग विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (टप्पा ३) अंतर्गत २३ हजार किमी रस्ते बांधण्याची घोषणा करण्यात आली आहे. याशिवाय १ हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रिट रस्त्यांनी जोडण्यासाठी ४ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# २५ लाख बहिणी होणार लखपती दिदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत राज्याचा २०२६-२७ या वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर करताना महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर विशेष भर देणाऱ्या अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. महिलांसाठी सुरू असलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुढेही कायम ठेवण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला असून त्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय स्वयंसहाय्यता गटांमार्फत महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी 'लखपती दिदी' उपक्रमाचा विस्तार, एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण आणि महिला बचतगटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी 'उमेद मॉल' उभारण्याची घोषणाही करण्यात आली.

महिला सक्षमीकरणाशी संबंधित योजनांचा



आढावा देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर महिलांना उत्पन्ननिर्मितीच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या अभियानामुळे ग्रामीण भागातील महिलांचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली असून त्यांच्या आर्थिक स्थितीत लक्षणीय सुधारणा होत आहे.

या पार्श्वभूमीवर 'लखपती दिदी' उपक्रमाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, आतापर्यंत राज्यात सुमारे ३७ लाख महिला 'लखपती दिदी' बनल्या आहेत. म्हणजेच विविध उपक्रमांमधून त्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा अधिक झाले आहे. या योजनेचा पुढील टप्पा म्हणून २०२६-२७ या आर्थिक वर्षात आणखी २५ लाख महिलांना 'लखपती दिदी' बनवण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या उद्दिष्टासाठी प्रशिक्षण, उद्योगविकास, उत्पादनवाढ आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महिलांच्या सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याची घोषणाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. सध्या राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकल महिलांचे सर्वेक्षण सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. हे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर त्याचे सखोल विश्लेषण करून एकल महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि सुरक्षिततेशी संबंधित गरजा लक्षात घेऊन राज्य सरकारकडून विशेष धोरण तयार करण्यात येईल, असे त्यांनी नमूद केले. या धोरणाच्या माध्यमातून एकल महिलांना शासकीय योजनांचा लाभ अधिक सुलभपणे मिळावा यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

दरम्यान, महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांनी तयार केलेल्या वस्तूंना स्थिर आणि मोठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारकडून महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, स्वयंसहाय्यता गटांच्या उत्पादनांना विक्रीची संधी मिळावी आणि त्यातून महिलांचे उत्पन्न वाढावे या उद्देशाने पहिल्या टप्प्यात १३ जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल जिल्हा विक्री केंद्र' उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. या केंद्रांमधून महिला बचतगटांनी तयार केलेल्या विविध वस्तूंची थेट विक्री केली जाईल.

# २ लाखांपर्यंत कर्जमाफी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्याच्या २०२६-२७ आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा करत २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर केली. विधानसभा निवडणुकीदरम्यान दिलेला शब्द पूर्ण करत सरकारने ही घोषणा केल्याने राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. अनेक दिवसांपासून प्रतीक्षा असलेल्या कर्जमाफीच्या निर्णयामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी अर्थसंकल्पात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर केली. या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीककर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. त्यामुळे कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले.

कर्जमाफीसोबतच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही विचार करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. जे शेतकरी वेळेवर कर्ज परतफेड करत आहेत, अशा पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर स्वरूपात ५० हजार रुपयांचे अनुदान देण्याची घोषणाही करण्यात आली. कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर अनुदान या दोन्ही निर्णयांमुळे शेती क्षेत्राला मोठा आधार मिळेल, असा दावा सरकारकडून करण्यात आला आहे.

या निर्णयासाठी शासनाने पूर्वी एक समिती स्थापन केली होती. त्या समितीच्या शिफारशींच्या आधारे कर्जमाफीचा निर्णय घेण्यात आल्याची माहितीही फडणवीस यांनी विधानसभेत दिली. शेतकरी वारंवार कर्जबाजारी होऊ नयेत आणि त्यांना कायमस्वरूपी कर्जमुक्त करण्यासाठी उपाययोजना करण्याचा शासनाचा संकल्प असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## कांद्याला सरासरी अवघा १० रुपये किलो असा भाव

# आखाती देशांतील तणावाच्या झळा शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण** : खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटमध्ये कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली असून निर्यात ठप्प झाल्याचा फटका थेट कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसू लागला आहे. बाजारात तब्बल १३ हजार पिशव्यांची आवक झाली असताना कांद्याला सरासरी अवघा १० रुपये किलो असा भाव मिळत आहे. चाकण येथून मोठ्या प्रमाणावर कांद्याची निर्यात अखाती देशांमध्ये होत असते. मात्र मध्यपूर्वेतील तणावपूर्ण परिस्थितीमुळे ही निर्यात थांबल्याने स्थानिक बाजारावर त्याचा तात्काळ परिणाम दिसू लागला आहे.

निर्यातदारांच्या माहितीनुसार दुबई येथील प्रमुख आयात बाजारपेठ तात्पुरती बंद झाल्याने भारतीय कांद्याची निर्यात थांबली आहे. मुंबईतील जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण येथे निर्यातीसाठी सज्ज असलेले १५० हून अधिक कंटेनर अडकून पडले आहेत. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कांदा असून निर्यात प्रक्रिया ठप्प झाल्याने व्यापारी आणि शेतकरी दोघांच्याही चिंतेत भर पडली आहे.

नाशवंत स्वरूपाचा लाखो टन कांदा कंटेनरमध्ये आणि बंदर परिसरात अडकून राहिल्याने तो खराब होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दुबई ही भारतीय कांद्याची प्रमुख निर्यात बाजारपेठ मानली जाते. विशेषतः महाराष्ट्रातील कांदा मोठ्या प्रमाणावर अखाती



देशांकडे पाठविला जातो. मात्र सध्या जहाजवाहतूक, विमा प्रक्रिया आणि आयात व्यवहारांवर परिणाम झाल्याने दुबईतील व्यापारी माल स्वीकारण्यास पुढे येत नसल्याचे निर्यातदारांनी सांगितले. परिणामी निर्यात प्रक्रियेत अनिश्चितता निर्माण झाली असून व्यापारी आणि शेतकरी दोघांचेही आर्थिक गणित विस्कळीत झाले आहे.

चाकणसारख्या मोठ्या बाजारपेठेत उत्तम प्रतीच्या कांद्यालाही घाऊक बाजारात अवघा १० रुपये किलो असा भाव मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची खंत कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली. खेड बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे यांनीही हीच चिंता व्यक्त करत निर्यात ठप्प झाल्याचा परिणाम थेट बाजारभावावर होत असल्याचे सांगितले. मध्यपूर्वेत वाढलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता शेतीमालाच्या व्यापारावर दिसू लागला आहे. अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील तणावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा परिणाम अखाती देशांतील बाजारपेठांवर झाला असून त्याची झळ महाराष्ट्रातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्याचे चित्र आहे. चाकण मार्केटमध्ये येणाऱ्या मोठ्या निर्यातदार कंपन्यांच्या प्रतिनिधींनीही दुबईतील बाजारपेठ पूर्णपणे ठप्प झाल्याचे सांगितले. त्यामुळे कांद्यासह इतर कृषी उत्पादनांची निर्यातही थांबली आहे. कांदा नाशवंत असल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. निर्यात बंद असल्याने स्थानिक बाजारात मिळेल त्या दरात कांदा विकण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय उरलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. दरम्यान दुबईमधील जेबेल अली हे मध्यपूर्वेतील सर्वांत मोठ्या बंदरांपैकी एक असून जगातील मोठ्या प्रमाणातील कंटेनर वाहतूक येथून होते. येथून शेतीमालाची आयात करून तो पुढे इतर अखाती देशांमध्ये वितरित केला जातो. मात्र चार दिवसांपासून बंदर परिसरातील कामकाज थांबवण्यात आल्याने सुमारे २०० हून अधिक कंटेनर उतरवले गेलेले नाहीत.

## मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी अर्चना कुटेना अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड** : २ हजार ४६७ कोटी रुपयांच्या कथित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई करत अर्चना सुरेश कुटे यांना अटक केली आहे. मुंबई विभागीय कार्यालयाने २ मार्च रोजी प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉन्ड्रिंग ॲक्ट २००२ अंतर्गत ही कारवाई केली. मेसर्स ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडशी संबंधित आर्थिक घोटाळ्याच्या तपासादरम्यान ही अटक करण्यात आली असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. अटक केल्यानंतर अर्चना कुटे यांना मुंबईतील विशेष पीएमएलए न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना पुढील तपासासाठी ७ मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली आहे.

ईडीकडून जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, मनी लॉन्ड्रिंगच्या चौकशीचा हा भाग असून या प्रकरणाची सुरुवात जुलै २०२४ मध्ये महाराष्ट्रातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल करण्यात आलेल्या एफआयआरवरून झाली होती. या एफआयआरमध्ये सुरेश कुटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी १२ ते १४ टक्क्यांपर्यंत परताव्याचे आमिष दाखवत गुंतवणूक योजना सुरू करण्यात आल्या होत्या.

## संपादकीय

# इराणवरील थेट हल्ला आणि जागतिक परिणाम



**अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेला थेट हल्ला अचानक झाला नाही; हा जवळजवळ एक दशक घडलेल्या राजकीय, आंतरराष्ट्रीय आणि सैन्य घडामोडींचा कळस आहे. त्याचा प्रभाव फक्त मध्यपूर्वेपुरता मर्यादित नाही, तर जागतिक ऊर्जा, व्यापार आणि सुरक्षा संतुलनावरही पडतो.**

मागे वळून पाहिल्यास, हा संघर्ष अचानक वाढलेला नाही. २०१८ मध्ये, डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचा अणुकार्यक्रम नियंत्रित करण्यासाठी बनवलेल्या बहुपक्षीय करारातून अमेरिकेने माघार घेतली. त्या वेळेस आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीने तपासणी करून प्रमाणित केले होते की इराणने त्याचे अणुकार्य शांततापूर्ण मर्यादित ठेवले आहे. ३.६७ टक्के समृद्धीकरण मर्यादिचे पालन, ३०० किलोपेक्षा कमी युरेनियम साठा आणि मर्यादित सेंट्रीफ्यूज यामुळे आंतरराष्ट्रीय समुदायास इराणच्या वचनबद्धतेचा विश्वास होता. ट्रम्प यांनी असा युक्तिवाद केला की हा करार इराणला अण्वस्त्रे मिळण्यापासून रोखू शकत नाही, तसेच इराणच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कार्यक्रमांना किंवा प्रादेशिक कारवायांना हाताळू शकत नाही. अमेरिकेने माघार घेतल्यावर पुन्हा निर्बंध लादले, ज्यामुळे इराणने आपली वचनबद्धता हळूहळू थांबवली. जून २०२५ पर्यंत, इराणने ४०८ किलो युरेनियम ६० टक्के शुद्धतेपर्यंत समृद्ध केले, जे शस्त्रास्त्र-ग्रेडच्या अगदी जवळ होते. त्याच वेळी, इराणच्या प्रादेशिक स्थितीवर परिणाम झाला. इस्रायलने हमास आणि हिजबुल्लाहसह विरोधकांना लक्ष्य केले; सीरियामध्ये असद राजवटीच्या पतनाने इराणला धोरणात्मक सहकार्याचा आधार कमी झाला. या घटनेनंतर इराणला येमेनमधील हुथी आणि इराकमधील काही मिलिशिया यावर अवलंबून राहावे लागले. जून २०२५ मध्ये इस्रायलने १२ दिवस चाललेल्या हवाई हल्ल्यांमध्ये इराणच्या लष्करी पायाभूत सुविधा आणि क्षेपणास्त्र स्थळांना लक्ष्य केले. ऑपरेशन 'मिडनाईट हॅमर'मध्ये अमेरिकेने इराणी अणु सुविधांवर बंकर-बस्टर बॉम्ब टाकले. हे अमेरिकेच्या इतिहासातील इराणवर पहिल्या थेट हल्ल्याचे उदाहरण ठरले. १९७९ मध्ये राजदूत बंदी, १९८३ मध्ये बेरूत बॉम्बस्फोट, आणि सलग दशकभर अमेरिकेने थेट हस्तक्षेप टाळले असतानाही, आता थेट हल्ला झाल्याचे स्पष्ट झाले. या संघर्षाचा परिणाम फक्त मध्यपूर्वेपुरता मर्यादित नाही. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जगातील तेल आणि वायूचा पाचवा भाग वाहतो. इराणवरील हल्ल्यामुळे हा मार्ग आडवा झाला, ज्यामुळे ब्रेंट क्रूडच्या किमती युद्धपूर्व $६५ प्रति बॅरलच्या पातळीपेक्षा $१० अधिक वाढल्या आहेत. भारतासारख्या ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसाठी ही परिस्थिती दीर्घकालीन आर्थिक समस्या निर्माण करू शकते. भारताची रोजची सरासरी तेल आयात, विशेषतः होर्मुझच्या मार्गातून, जवळपास ४ दशलक्ष बॅरल आहे. कच्च्या तेलाच्या दरात प्रत्येक १ डॉलर वाढीमुळे वार्षिक आयात बिलात २ अब्ज डॉलरची भर पडते. २०२४-२५ मध्ये भारताचे तेल आयात बिल १३७ अब्जवर पोहोचले आहे. जर संघर्ष पुढे गेला, तर व्यापार तुटीवर दबाव येईल आणि रुपयावर नकारात्मक परिणाम होईल. सामरिक दृष्टिकोनातून पाहिले तर, भारताला ही स्थिती फक्त आर्थिक नव्हे, तर सुरक्षा आव्हानही निर्माण करते. हिंद महासागरातील समुद्री मार्ग सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे; कारण तेल पुरवठा स्थिर राहणे ही राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक स्थैर्याची आवश्यकता आहे. भारताने या घटनेमुळे आपल्या सागरी धोरणाला पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक आहे, विशेषतः नौदलाच्या गस्त आणि मित्रदेशांसह सहकार्य वाढवणे आवश्यक आहे. मानवी पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे भारतीय कामगारांना धोका निर्माण झाला आहे. लाखो भारतीय कामगार या प्रदेशात कार्यरत आहेत, ज्यांचे आर्थिक योगदान भारताच्या चलन स्थैर्याशी जोडलेले आहे. हवाई मार्ग अडथळ्यांमुळे परदेशस्थ भारतीयांसाठी सुरक्षित निर्गमन सुनिश्चित करणे अत्यावश्यक आहे. राजकीय आणि सामरिक स्थैर्यासाठी भारताने संतुलित परराष्ट्र धोरण अंगीकारणे आवश्यक आहे. मध्यपूर्वेतील सर्व घटकांसोबत संवाद राखणे, ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण, धोरणात्मक साठवणूक वाढवणे, सागरी सुरक्षा बळकट करणे आणि परदेशस्थ नागरिकांसाठी पूर्वतयारी ठेवणे हे पायाभूत उपाय आहेत. हा संघर्ष केवळ मध्यपूर्वेतील राजकीय व सागरी समस्या नसून, जागतिक शक्तिसंतुलन बदलणारा टप्पा आहे. तेल, ऊर्जा, व्यापार आणि सुरक्षा या सर्व क्षेत्रांवर परिणाम होतो. भारतासाठी ही वेळ धोक्याची असली तरी संधीचीही आहे. जागतिक संघर्षात संतुलित भूमिका घेत, ऊर्जा स्वावलंबनाकडे वाटचाल करत, सागरी सुरक्षा बळकट करून भारत आपले स्थान दृढ करू शकतो. समुद्राच्या अथांग पाण्यातील घटनांवर प्रतिसाद देताना शहाणपण, संयम आणि दूरदृष्टी लागते. ऊर्जा आणि सुरक्षा यांची कसोटी आता भारतावर आली आहे.

# बिहारच्या राजकारणातील नवा अध्याय

**२००५ पासून बिहारच्या राजकारणाचे केंद्रबिंदू राहिलेल्या नितीश कुमार यांनी राज्यसभेसाठी अर्ज दाखल केला. त्यांच्या राज्यातून दूर जाण्याचा निर्णय राजकीयदृष्ट्या अशांत बिहारसाठी नवा अध्याय सुरू करतो, जिथे मंडल, जातीय आणि महिला राजकारणाचे संतुलन पुन्हा तपासले जाणार आहे.**



बिहारच्या राजकारणात नितीश कुमार यांचे नाव नेहमीच विशेष स्थान ठेवते. २००५ पासून ते राज्याचे मुख्यमंत्री म्हणून आले आणि गेल्या दोन दशकांत त्यांनी आपले नेतृत्व राज्याच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक रचनेवर अधोरेखित केले. जातीय आणि सांप्रदायिक ताण कमी करून त्यांनी मध्यममार्गीय धोरण राबवले, ज्यामुळे "सामाजिक न्याय" ही संकल्पना आता "विकास"शी जोडली गेली. नितीश यांच्या नेतृत्वाखाली बिहारने राजकीय स्थैर्य अनुभवले, जरी इतर राष्ट्रीय चळवळी राज्यात आपले प्रभाव दाखवत होत्या.

१९९० च्या दशकात बिहारमध्ये जातीय राजकारणाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात होता. लालू प्रसाद यादवांनी संस्थात्मकीकरणाचे नेतृत्व करत सामाजिक न्यायाच्या नावाखाली जनतेला गटित केले. त्यांच्या दृष्टिकोनात अनेकदा फक्त स्वतःच्या जातीकडे किंवा कुटुंबीय गटांकडे लक्ष जात असे. नितीश यांनी ते बदलण्याचे काम केले. त्यांनी राज्याचे अधिकार पुनर्संचयित केले, ओबीसी, अत्यंत मागास गट (ईबीसी), दलित आणि मुस्लिम घटक यांना एकत्र आणले, आणि जातीय संघर्ष कमी करण्यासाठी धोरणे राबवली.

> **भाजप बिहारमध्ये सरकार स्थापन करू शकेल की नाही, हे फक्त मतसंख्येवर नाही, तर स्थानिक नेतृत्व, जातीय संतुलन, महिला मतदारांचा सहभाग आणि विकासाच्या मुद्द्यांवर अवलंबून असेल.**

नितीश यांनी विशेषतः महिला मतदारांसाठी महत्वाची कामगिरी केली. बालिका सायकल योजना, सरकारी नोकऱ्यांमध्ये महिला आरक्षण, पंचायत संस्थांमध्ये महिला प्रतिनिधित्व आणि स्वयं-मदत गटांच्या जीविका नेटवर्कसह त्यांनी स्त्रियांसाठी धोरणात्मक रचना तयार केली. या प्रयत्नांमुळे बिहारमध्ये महिलांचा राजकीय आणि सामाजिक सहभाग अधिक दृढ झाला.

राजकीयदृष्ट्या, नितीश यांनी एक स्थिर युती राबवली. भाजपसोबत युती करून त्यांनी गैर-यादव ओबीसी, अत्यंत मागास गट आणि मुस्लिम घटक यांना एकत्र केले. विशेषतः ईबीसींच्या एकत्रीकरणात त्यांचे योगदान महत्त्वाचे होते. या युतीने मंडलच्या चाकांना स्थैर्य दिले आणि प्रबळ ओबीसी गटांच्या सक्षमीकरणाला संतुलन मिळाले. मात्र, आता नितीश कुमार बिहारपासून दूर जात आहेत. त्यांच्या उत्तराधिकारीचा प्रश्न अजूनही उरलेला आहे. जद(यू) पक्षाचे अनेक नेते आपापसात संघर्ष करीत आहेत, पक्ष विभक्त झाल्याचा आवाज ऐकू येतो. भाजपसह युती ठाम आहे, पण नितीश यांच्या अनुपस्थितीत पक्षासाठी जबाबदारी वाढली आहे. मुख्य विरोधक राजद आणि नवीन प्रवेश करणारा जन सुराज पक्ष या रिक्त जागेवर आपला दबाव वाढवत आहेत.

भाजप बिहारमध्ये सरकार स्थापन करेल का, हा प्रश्न सध्या राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू आहे. नितीश कुमार राज्यातून दूर जात असल्याने जद(यू)च्या नेतृत्वात असलेली स्थिरता धोक्यात आली आहे. भाजपकडे मतदारसंघांची ताकद आहे, पण स्थानिक घटक आणि ओबीसी-ईबीसी गटांमध्ये त्याचे प्रमाण जास्त नाही. जद(यू)-भाजप युती टिकवणे हे भाजपसाठी धोरणात्मक गरज आहे, कारण नितीशच्या अनुपस्थितीत युती नसल्यास विरोधक राजद आणि नवीन जन सुराज पक्ष या रिक्त जागेवर आपला दबाव वाढवतील.

भाजप बिहारमध्ये सरकार स्थापन करू शकेल की नाही, हे फक्त मतसंख्येवर नाही, तर स्थानिक नेतृत्व, जातीय संतुलन, महिला मतदारांचा सहभाग आणि विकासाच्या मुद्द्यांवर अवलंबून असेल. जर भाजप योग्य धोरणात्मक समायोजन करून जद(यू)च्या किंवा स्वतंत्र घटकांच्या सहयोगाने युती टिकवली, तर सरकार स्थापन होणे शक्य आहे; अन्यथा, विरोधकांना फायदा होऊ शकतो आणि राज्यात राजकीय अस्थिरता वाढू शकते.

या परिस्थितीत बिहारमध्ये राजकीय स्थैर्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. नितीश यांच्या कार्यकाळात स्थापन केलेले संतुलन, जातीय आणि महिला घटकांचे राजकीय योगदान, तसेच विकासावर केंद्रित धोरण आता पुन्हा नव्या नेतृत्वाखाली तपासले जाणार आहे.

सामाजिक न्याय आणि विकास यांच्यातील संतुलन राखणे, विविध जाती आणि समुदायांना समाविष्ट करून राजकीय धोरणे राबवणे आणि महिलांच्या सक्षमीकरणावर लक्ष ठेवणे हे सर्व पैलू आता बिहारच्या नवनिर्मितीच्या प्रवासाचा आधार ठरणार आहेत.

नितीश कुमार यांनी बिहारमध्ये दोन दशकांचा वाटाडेपणा केला, परंतु आता राज्याला नवीन नेतृत्व आणि नवीन राजकीय समीकरणांची गरज आहे.

राज्यसभेसाठी त्यांचा नाट्यमय निर्णय हे एक टप्पा आहे, ज्यामुळे बिहारच्या राजकारणात नवा अध्याय सुरू होतो, जिथे जातीय, सामाजिक, महिला आणि विकासाच्या राजकारणाचे संतुलन पुन्हा तपासले जाईल, आणि राज्याची नवी कहाणी उभी राहील.

# आ. अमित गोरखे यांच्या लक्षवेधीला यश

## अग्निशामक विभागातील भरती आणि कथित भ्रष्टाचाराची सखोल चौकशी होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागातील 'सावळ्या गोंधळाची' चौकशी लवकरच होणार आहे. आमदार अमित गोरखे यांनी विधान परिषदेत मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर मंत्र्यांनी उच्चस्तरीय समिती गठित करून सखोल चौकशी करण्याचे आश्वासन दिले. दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले.

आमदार गोरखे यांनी महापालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले, पिंपरी-चिंचवडसारख्या औद्योगिक



शहराच्या सुरक्षेसाठी मुख्य अग्निशामक अधिकारी हे पद अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र, काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हे पद रिक्त ठेवून, ऋषिकेश चिपडे यांना अतिरिक्त पदभार देऊन कारभार चालविला, ज्यामुळे प्रशासकीय दिरंगाई आणि भ्रष्टाचाराला वाव मिळाला आहे.

मंत्री उदय सामंत यांनी सांगितले की, ३१ ऑक्टोबर २०२२ पासून मुख्य अग्निशामक अधिकारी पद रिक्त होते, तरीही अतिरिक्त कार्यभार असताना नियमित भरती अपेक्षित होती. या प्रकरणाची सखोल चौकशी उच्चस्तरीय समितीद्वारे केली जाईल. तसेच, ऋषिकेश चिपडे यांनी दिलेल्या सर्व एनओसी आणि परवानग्यांची फेरतपासणी केली जाईल. दोषी आढळल्यास तत्कालीन सहाय्यक आयुक्त, उपायुक्त किंवा इतर अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल.

सभागृहात आमदार श्रीकांत भारतीय आणि उमा खापरे यांनीही या मुद्द्याची गंभीरता अधोरेखित केली. एकाही दोषीला सोडले जाणार नाही, अशी ग्वाही सरकारकडून देण्यात आली.

### ऐतिहासिक पार्श्वभूमी

- भरती प्रक्रियेतील घोटाळा – २०२२ मध्ये पदभरतीसाठी परीक्षा घेण्यात आली; पात्र उमेदवार अपात्र ठरवून विशिष्ट व्यक्तीला पदभार कायम ठेवण्याचा आरोप.
- संशयास्पद खरेदी व्यवहार – ऋषिकेश चिपडे यांच्या कार्यकाळातील साधनसामग्री खरेदी आणि निविदा प्रक्रियेत अनियमितता.
- एनओसी वाटपाचा सावळागोंधळ – शहरातील इमारतींना नियम पाळता न देता एनओसी आणि परवानग्या देण्याचा संशय.

# मावळात भाजपने कोअर कमिटीच बदलली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मावळ** : जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर मावळ भाजपने अखेर आत्मचिंतन करत पक्ष संघटनेत सर्वाधिकार असणारी कोअर कमिटी बरखास्त करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या कोअर कमिटीमध्ये तरुणांना संधी देण्याचा निर्णय घेत, पक्षाची सूत्रे ज्येष्ठांकडून तरुणांकडे सोपवण्याचा मोठा निर्णय घेतला गेला असल्याचे दिसते.

तब्बल २५ वर्षे सलग मावळ विधानसभा, मावळ पंचायत समिती आणि लोणावळा नगर परिषदेतील सत्ता भाजपने गमावली आहे. याशिवाय तळेगाव नगर परिषदेतील भाजपचे नगराध्यक्ष महायुतीत विजयी झाले तरी, फक्त १० नगरसेवक पक्षाकडे राहिले. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपला एकही जागा मिळाली नाही. एकंदर या सर्व पराभवामुळे मावळ तालुक्यात भाजपच्या हातात एकही सत्ताकेंद्र उरले नाही, ज्यामुळे तालुका कमळमुक्त झाल्याची परिस्थिती निर्माण झाली.

धुलीवंदनाच्या दिवशी माजी राज्यमंत्री संजय भेगडे, भाजप किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे, भाजप कोअर कमिटीचे अध्यक्ष निवृत्ती शेटे यांच्यासह सर्व सदस्य, पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, मंडल अध्यक्ष आणि नुकत्याच पराभूत उमेदवार उपस्थित होते.

# नवी सांगवीतील तिघांना ९.५० लाखांचा गंडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : शेअर बाजारात दरमहा १० ते २० टक्के नफ्याचे आमिष दाखवून तिघांची सुमारे ९ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक झाल्याची घटना नवी सांगवी येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून मुख्य आरोपी अद्याप फरार आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही फसवणूक ८ एप्रिल २०२३ ते ४ मार्च २०२६ या कालावधीत नवी सांगवीतील समर्थनगर येथील 'गणेश पॅलेस'मध्ये घडली. या प्रकरणी प्रतीक संजय तोडमल (वय २९, रा. नवी सांगवी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीच्या तक्रारीनुसार प्रवीण विठ्ठल काटकर (वय ३३) यांनी तोडमलसह दीपक लोंढे आणि अक्षय सुतार यांना "पी. के. प्रॉफिट ट्रेडिंग" या कंपनीत शेअर बाजाराशी संबंधित गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले.

गुंतवणुकीवर दरमहा १० ते २० टक्के नफा मिळेल आणि एक वर्षानंतर मूळ रक्कम परत मिळेल, असे आरोपीने तिघांना दाखवले. यासाठी त्याने तिघांशी लेखी करारही केला होता. आरोपीने तोडमलकडून २ लाख ५० हजार रुपये, दीपक लोंढेकडून ५ लाख रुपये आणि अक्षय सुतारकडून २ लाख रुपये अशी एकूण ९ लाख ५० हजार रुपयांची गुंतवणूक स्वीकारली.

# रेडी रेकनर दरांमध्ये प्रस्तावित वाढ रद्द करावी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी राज्याच्या नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून पुण्यात रेडी रेकनर दरांमध्ये १० टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव मांडला असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रस्तावाला अग्रवाल मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड एज्युकेशन (एएमसीसीआयई) कडून तीव्र विरोध करण्यात आला आहे.

संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश अग्रवाल म्हणाले की, सध्या जमीन, सिमेंट, स्टील, मजुरी तसेच इतर बांधकाम साहित्याच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यामुळे घरांच्या किंमती आधीच वाढल्या असून



सर्वसामान्य नागरिक, मध्यमवर्गीय कुटुंबे आणि तरुणांसाठी स्वतःचे घर खरेदी करणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत रेडी रेकनर दरांमध्ये आणखी १० टक्के वाढ केल्यास मुद्रांक शुल्क आणि मालमत्ता व्यवहाराचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढेल आणि घर खरेदीचे स्वप्न सर्वसामान्यांसाठी अधिक दूर जाईल.

ते म्हणाले की, पुणे हे महाराष्ट्रातील वेगाने विकसित होणारे औद्योगिक व आयटी केंद्र असून रिअल इस्टेट आणि बांधकाम क्षेत्र हे शहराच्या अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. या क्षेत्रातून लाखो लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळतो. मात्र रेडी रेकनर दरांमध्ये वारंवार वाढ झाल्याने मालमत्ता व्यवहारांवर नकारात्मक परिणाम होतो, गुंतवणूक कमी होते आणि बाजारपेठेतील गती मंदावते.

या पार्श्वभूमीवर एएमसीसीआयईने महाराष्ट्र शासनाकडे खालील मागण्या केल्या आहेत. पुण्यात प्रस्तावित १० टक्के वाढ तात्काळ रद्द करण्यात यावी, सध्याचे रेडी रेकनर दर किमान पुढील पाच वर्षांसाठी स्थिर ठेवावेत. सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध व्हावीत यासाठी शासनाने लोकाभिमुख निर्णय घ्यावेत. तसेच रिअल इस्टेट क्षेत्रातील प्रमुख संस्था जसे की क्रेडाई तसेच इतर बिल्डर्स व उद्योग संघटनांनी या प्रस्तावित वाढीला ठाम विरोध करावा आणि सर्वसामान्य घरखरेदीदारांच्या हितासाठी एकसंघ भूमिका ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले आहे. याशिवाय सर्व पक्षांचे आमदार, मंत्रिमंडळातील मंत्री आणि माननीय मुख्यमंत्री यांनी या प्रस्तावाचा गांभीर्याने विचार करून जनहिताचा निर्णय घ्यावा.

## डॉ. ओंकार हरी माळी यांनी मराठी उद्योजकांच्या नव्या युगाला दिली गती

# उद्यमी पुरस्कार २०२६ मध्ये ३५० उद्योजकांचा गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : तळागाळातील उद्योजकता आणि उत्पन्न निर्मितीला प्रोत्साहन देणाऱ्या उद्यमी पुरस्कार सोहळ्यात पुण्यातील बाणेर येथील बंतारा भवनात महाराष्ट्रातील ३५० उद्योजकांचा सन्मान करण्यात आला. हा सोहळा उद्योजक मार्गदर्शक व आयात-निर्यात तज्ज्ञ डॉ. ओंकार हरी माळी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला होता. शाश्वत आणि उत्पन्ननिर्मिती करणाऱ्या व्यवसायांमधील उद्योजकांचा गौरव करत या कार्यक्रमाने महाराष्ट्रातील प्रादेशिक उद्योजकांचा वाढता व्यावसायिक प्रभाव अधोरेखित केला.

सन्मानित उद्योजकांसाठी हॉल ऑफ फेम, उद्यमी लक्षपती, उद्यमी दशलक्षपती, उद्यमी करोडपती, उद्यमी वॉरियर आणि उद्यमी गेम चेंजर अशा विविध श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले. डॉ. ओंकार हरी माळी आणि आकांक्षा ओंकार माळी यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. सोहळ्यातील प्रमुख आकर्षण म्हणजे 'करोडपती फेलिसिटेशन सेरेमनी', ज्यामध्ये मोठ्या उलाढालीचा टप्पा गाठलेल्या उद्योजकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

सभेला संबोधित करताना




डॉ. माळी म्हणाले, "उद्योजकता आता फक्त महानगरांपुरती मर्यादित नाही. महाराष्ट्रातील गावागावांतून उद्योजक जागतिक स्तरावर व्यवसाय उभारतात आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान देतात. शून्य अनुभवातून सुरुवात करून १ लाख ते ५० कोटी रुपयांपर्यंत उलाढाल गाठणाऱ्या सर्व उद्योजकांचा मला अभिमान आहे."

उद्योग क्षेत्रातील दृष्टीकोन मांडण्यासाठी बीव्हीजी ग्रुपचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक हनमंतराव गायकवाड विशेष वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी उद्योगवाढ आणि राष्ट्रनिर्मितीत उद्योजकतेची भूमिका यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात 'फेडरेशन ऑफ मराठी आंत्रप्रेन्योर्स'च्या २४ अध्यायांच्या स्थापनेची घोषणा करण्यात आली, जी राज्यभर एक संघटित उद्योजकीय परिसंस्था उभारण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा मानली जात आहे. तसेच 'महाराष्ट्र कनेक्ट' या नव्या उपक्रमाचे अनावरण करण्यात आले.

डॉ. माळी यांनी या कार्यक्रमात आपले आगामी पुस्तक 'मराठी ते मिलियनियर' देखील लोकार्पित केले, ज्यात ५१ यशस्वी उद्योजकांच्या प्रेरणादायी कथा आहेत. पुस्तकाचे प्रकाशन हनमंतराव गायकवाड, त्यांच्या आई-वडील, आकांक्षा माळी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉली रितेश दवे आणि मुख्य तंत्रज्ञान अधिकारी शिवम ठाकूर यांच्या उपस्थितीत झाले. याशिवाय एका नव्या चित्रपट बॅनरच्या स्थापनेची घोषणा देखील करण्यात आली, ज्यामुळे शिक्षण, प्रेरणा आणि उद्योजकीय कथा सांगण्यावर भर दिला जाईल.

डॉ. माळी यांनी २०२० मध्ये 'उद्यमी महाराष्ट्र' चळवळ सुरू केली, ज्याद्वारे आयात-निर्यात या चळवळीने महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण आणि राज्यातील उत्पादन उद्योगांसाठी निर्यात प्रशिक्षणही राबवले आहे.

# पदोन्नत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत कार्यरत आवश्यक शैक्षणिक पात्रता प्राप्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शिक्षक पदावर पदोन्नती मिळाल्यास त्यांना नियमित वेतनश्रेणीत मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याबाबत राज्य शासनाने १८ फेब्रुवारी २०२६ रोजी आदेश जारी केला आहे.

यापूर्वी २००५ च्या शासन निर्णयानुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्याला शिक्षक पदासाठी शैक्षणिक पात्रता मिळाल्यानंतर शिक्षण सेवकाचा तीन वर्षांचा कालावधी पूर्ण करावा लागायचा. त्यामुळे चाळीस ते पन्नास हजार वेतन मिळणाऱ्या कर्मचाऱ्याला अत्यंत कमी मानधनावर सेवा करावी लागत असे आणि आर्थिक कुचंबणा निर्माण होत असे. पूर्णवेळ वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिक्षण सेवकाच्या अटी लागू केल्यामुळे त्यांना मानधन तत्वावर काम करावे लागत होते.

नव्या आदेशानुसार शिक्षकेतर पदावरून शिक्षक पदावर पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना शिक्षण सेवकाऐवजी नियमित वेतनश्रेणीत वेतन निश्चित केले जाईल. या निर्णयात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सुहास रंगरावजी मोरे यांच्या न्याय निवाड्याचा संदर्भ दिला आहे. न्यायालयाच्या निकालानुसार खालच्या पदावर काम करणारा कर्मचारी पदोन्नत होऊन वरच्या पदावर जातो, त्यामुळे जबाबदारी वाढते; अशावेळी वेतन कमी करणे अन्यायकारक ठरते.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) I **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### लोणी काळभोर येथे ट्रकची कारला धडक

**लोणी काळभोर :** पुणे-सोलापूर महामार्गावरील कवडीपाठ टोलनाक्याजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने कारला पाठीमागून जोरदार धडक दिल्याची घटना घडली. कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील काळभोर लॉन्ससमोरील दुभाजकाजवळ गुरुवारी दुपारी साडेतीन वाजता हा अपघात झाला. या अपघातात कारचे मोठे नुकसान झाले असले तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. याप्रकरणी ट्रकचालकावर लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संदीप होले असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या ट्रकचालकाचे नाव आहे. याप्रकरणी गणेश शिवाजीराव देशमुख यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### भिगवण शहरात धडक कारवाई

**भिगवण :** शहरात मॉडिफाईड सायलेन्सर, ट्रिपल सीट प्रवास आणि रंगीत काचा लावून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांचा वाढता त्रास याबाबत भिगवण पोलिसांनी तात्काळ धडक मोहीम राबवत शहरात मोठ्या प्रमाणात कारवाई केली. या विशेष तपासणी मोहिमेदरम्यान मॉडिफाईड बुलेट सायलेन्सर वापरणारी वाहने, दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास करणारे तसेच चारचाकी वाहनांना नियमबाह्य रंगीत काचा लावलेली वाहने आढळून आल्याने संबंधित वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

### कात्रज बोगद्याजवळ भीषण अपघात

**पुणे :** मुंबई- बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर सिमेंटची वाहतूक करणाऱ्या बल्करने दिलेल्या धडकेत दोघे जखमी झाले असून, तीन वाहनांचे नुकसान झाले आहे. हा अपघात गुरुवारी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास नवीन कात्रज बोगद्याच्या पुढे असलेल्या पेट्रोलपंपानजीक घडला आहे. अपघातात कारमधील चालक चरणदास लक्ष्मण आकटे (६४, रा. हरपुडे देवरुख, रत्नागिरी), सिमेंट बल्कर चालक आद्दश्यप्पा गुरू सिद्दप्पा मस्तीहोली (३५, रा. बेलगम कर्नाटक) जखमी झाले असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी आंबेगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

### जैदवाडी रस्ता वाद बैठकीत तहसीलदारांसमोर दिली धमकी

# पोलीस संरक्षण घेतले तरी दगडफेक करू

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** पुणे-नाशिक महामार्ग ते जैदवाडी या रस्त्याच्या वादावर तोडगा काढण्यासाठी बोलावण्यात आलेल्या बैठकीत काही कार्यकर्त्यांनी थेट तहसीलदारांसमोरच आक्रमक भूमिका घेत "पोलीस संरक्षण घेतले तरी दगडफेक करू, रस्ता होऊ देणार नाही," अशी धमकी दिल्याने तहसीलदार कार्यालयातील वातावरण काही काळ तणावपूर्ण झाले. गुरुवारी खेड तहसील कार्यालयात हा प्रकार घडला.

पुणे-नाशिक महामार्ग ते जैदवाडी हा सुमारे साडेचार किलोमीटर लांबीचा रस्ता खेड आणि आंबेगाव तालुक्याच्या सीमेवर आहे. या रस्त्याचे सिमेंट काँक्रिटचे काम मोठ्या प्रमाणावर पूर्ण झाले असले तरी सुमारे चारशे मीटरचे काम माळेगाव येथील काही आदिवासी शेतकऱ्यांनी अडवले आहे. संबंधित रस्ता त्यांच्या शेतातून जात असल्याने त्यासाठी आपली संमती नसल्याचा दावा करत त्यांनी कामाला विरोध दर्शविला आहे. अडवण्यात आलेला हा भाग आंबेगाव तालुक्यातील माळेगाव गावाच्या हद्दीत येतो.

या वादावर तोडगा काढण्यासाठी खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे आणि आंबेगावचे प्रभारी तहसीलदार सचिन वाघ यांच्या उपस्थितीत गुरुवारी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला दोन्ही बाजूंचे नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते. तहसीलदार बेडसे यांनी तक्रारदारांची समजूत काढण्याचा प्रयत्न करत दोन्ही बाजूंची मते ऐकून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. मात्र बैठकीदरम्यान काही कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेत उलटसुलट बोलणे सुरू केले.

"पोलीस संरक्षण घेतले तरी दगडफेक करू, रस्ता होऊ देणार नाही," अशी थेट धमकी दिल्यानंतर चर्चेला बोलावण्यात आलेल्या काही कार्यकर्त्यांनी बैठकीतून काढता पाय घेतला. तहसीलदारांसमोरच असा प्रकार घडल्याने उपस्थित अनेकजण आश्चर्यचकित झाले.

या बैठकीला जैदवाडीच्या सरपंच शितल विकास जैद, माजी सरपंच बाळासाहेब जैद, जवळपास शंभर कार्यकर्ते, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना विभागाचे उपअभियंता तसेच खेड व आंबेगाव तालुक्यातील मंडळ अधिकारी, तलाठी उपस्थित होते. दरम्यान, "हा रस्ता सुमारे पन्नास वर्षांपासून दळणवळणासाठी वापरात आहे. त्यामुळे त्यावर कोणालाही निर्बंध घालता येणार नाहीत. नियम व जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनांनुसार ३१ मार्चपर्यंत हा प्रश्न मार्गी लावला जाईल," अशी माहिती खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी दिली.

---

## प्रा.रामकृष्ण मोरे महाविद्यालयातील विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतुर :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या प्रा.रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्रथम वर्ष ए.आय.एम.एल. मध्ये शिक्षण घेणाऱ्या दोन विद्यार्थिनींना ओम प्रतिष्ठान वाल्हेकर वाडी, पुणे यांच्या सहकार्याने ६५,००० रुपये शिष्यवृत्ती म्हणून प्रदान करण्यात आली, अशी माहिती प्राचार्य डॉ.अभय खंडागळे यांनी दिली.

महाविद्यालयातील प्रथम वर्ष ए.आय.एम.एल. मध्ये शिकत असलेल्या श्रेया कुंभार आणि प्रज्ञा मोरे या हुशार, होतकरु विद्यार्थिनींना रम्या राजु आणि राजेश कुमार यांनी ओम फाउंडेशनच्या माध्यमातून ही शिष्यवृत्ती दिली.

सदर प्रसंगी ओम विद्यादान प्रतिष्ठानच्या ब्रँड अँबेसिडर प्रीती नारायण, टी.सी.एस. पुणेच्या विद्या महाजन, मीनल टोणगावकर तसेच ओम प्रतिष्ठानच्या संचालिका वनिता सावंत, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एम. बी. राठोड व डॉ.एच. बी. सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते. शिष्यवृत्ती प्रदान केल्याबद्दल पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा, महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार, संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव अॅड. संदीप कदम, ए.एम. जाधव, सहसचिव प्रशासन, उपसचिव एल.एम. पवार, खजिनदार अॅड. मोहन देशमुख आदी मान्यवरांनी ओम प्रतिष्ठान आभार मानले.

---

## शरद बँकेचे ठेव प्रतिनिधी विठ्ठल ढोबळे यांचा सन्मान

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील मंचर येथे शरद सहकारी बँकेच्या वतीने आयोजित सेवक प्रशिक्षण व स्नेह मेळाव्यात बँकेच्या सर्व शाखांतील दैनंदिन ठेव प्रतिनिधींचा सन्मान करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमात आंबेगाव तालुक्यातील सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी म्हणून बँकेच्या पारगाव शाखेचे विठ्ठल सिताराम ढोबळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष देवेंद्रशेठ शहा, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, संचालक शिवाजीराव लोंढे, अजय घुले, दौलतराव लोखंडे, दत्ताशेठ थोरात, जयसिंग थोरात, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब जाधव तसेच सर्व विभागप्रमुख, शाखाधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

विठ्ठल ढोबळे यांनी पारगाव शाखेत दैनंदिन ठेव प्रतिनिधी म्हणून कार्यरत असताना बँकेच्या व्यवसाय वृद्धीत महत्त्वाचा वाटा उचलला आहे. नियमित संपर्क, ग्राहकांशी जिव्हाळ्याचे संबंध आणि प्रामाणिक सेवेमुळे शाखेच्या ठेवींमध्ये लक्षणीय वाढ साध्य झाली आहे.

त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना आंबेगाव तालुक्यातील सर्वोत्कृष्ट प्रतिनिधी म्हणून गौरविण्यात आले.

विठ्ठल ढोबळे हे पारगाव ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच देखील होते आणि सध्या विद्यमान सदस्य म्हणून ग्रामविकासाच्या कामात सक्रिय सहभाग घेत आहेत. सामाजिक आणि बँकिंग क्षेत्रातील त्यांच्या कार्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

---

## चारा टंचाईचा मेंढपाळांना फटका

### आंबेगाव तालुक्यात धनगर मेंढपाळांचे वाडे दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात यवत परिसरातील धनगर मेंढपाळ चाऱ्याच्या शोधात दाखल झाले आहेत. (छाया : किशोर खुडे)


**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात यंदा उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच तीव्र चारा टंचाई निर्माण झाल्यामुळे मेंढपाळांना मोठे संकट निर्माण झाले आहे. परिसरात स्थानिक मेंढपाळांची संख्या लक्षणीय असून गेल्या चार-पाच वर्षांपासून नगर जिल्ह्यातील धनगर समाजातील मेंढपाळही मोठ्या प्रमाणावर येथे स्थलांतरित होत आहेत. मात्र यंदाच्या परिस्थितीने सर्वांनाच अडचणीत आणले आहे.

सामान्यतः एप्रिल-मे महिन्यात चाऱ्याची टंचाई जाणवते, परंतु यंदा फेब्रुवारी अखेरपासूनच हिरवा चारा उपलब्ध नाही. परिणामी शेळ्या-मेंढ्यांची आतापासूनच उपासमार सुरू झाली आहे. यंदा प्रथमच यवत भागातील धनगर मेंढपाळांनी आपल्या शेळ्या-मेंढ्यांसह आंबेगाव तालुक्यात चाऱ्याच्या शोधात दाखल होण्यास सुरुवात केली आहे. स्थानिक शेतकऱ्यांच्या शेतात उरलेली पिकांची काडीकचरा, मोकळी पडलेली जमीन आणि डोंगराळ भागातील गवत यावर मेंढपाळ सध्या उदरनिर्वाह करीत आहेत. उन्हाळ्याचे अजून दोन ते तीन महिने शिल्लक असून, ही परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. एकूणच, उन्हाळ्याच्या प्रारंभीच निर्माण झालेल्या चारा टंचाईमुळे आंबेगाव तालुक्यातील मेंढपाळांसमोर उदरनिर्वाहाचे मोठे आव्हान उभे राहिले असून येणारे दिवस अधिक कठीण ठरणार आहेत.

---

## प्रतिबंधित क्षेत्रात वीज पंप सोडणाऱ्याना समज

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भवानीनगर :** कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत इंदापूर तालुक्यातील निरा-भीमा नदी जोड जल स्थिरीकरण बोगद्याचे काम काही प्रमाणात पूर्ण झाले असून, या बोगद्याच्या प्रतिबंधित क्षेत्रातील विहिरी (शाफ्ट) मध्ये अनेक शेतकऱ्यांनी शेतीसाठी वीज पंप सोडले आहेत. याप्रकरणी संबंधित ग्रामपंचायतींना कृष्णा मराठवाडा बांधकाम विभागाच्या वतीने समजपत्र देऊन शेतकऱ्यांना खबरदारीचे आदेश देण्यात आले आहेत.

इंदापूर तालुक्यातील डाळज क्र. २, भादलवाडी, अकोले व काझड ग्रामपंचायतींना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, निरा-भीमा नदी जोड जल स्थिरीकरण प्रकल्पाच्या बोगद्याचे काम करण्यासाठी ठिकठिकाणी मोठ्या विहिरी (शाफ्ट) खोदण्यात आल्या असून यामधून बोगद्यातील दगड व माती बाहेर काढण्यात आली आहे. शाफ्ट क्र. ४, ५, ६ व ६अ हे प्रतिबंधित क्षेत्र असून येथे अनधिकृत पाण्याचा उपसा करणे बंद करावे आणि विहिरीजवळ येणे टाळावे, अशी सूचना दिली आहे.

पत्रात अधिक स्पष्ट करण्यात आले आहे की, या क्षेत्रात एखादी दुर्घटना झाल्यास त्याची सर्वस्व जबाबदारी संबंधित शेतकरी/शेतमजूर यांची राहील; कार्यालय किंवा शासन जबाबदार ठरणार नाही. तसेच, विहिरीत ठेवलेले वीज पंप व पाईपलाईन काढण्याचे निर्देश देखील दिले आहेत.

कृष्णा मराठवाडा बांधकाम उपविभागाचे उपविभागीय अधिकारी सु. भा. लाखे यांनी संबंधित ग्रामपंचायतींना पत्र दिले आहे. याशिवाय कार्यकारी अभियंता, तहसीलदार इंदापूर आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक वालचंदनगर यांना देखील याची माहिती देण्यात आली आहे.

हनुमंत वीर, ग्रामपंचायत सदस्य काझड, म्हणाले की, बोगद्याच्या कामामुळे लगतच्या शेतकऱ्यांच्या विहिरी व बोरवेलचे पाणी बोगद्यात उतरले असून उन्हाळ्यात विहिरी कोरड्या पडतात. अशावेळी शेतकऱ्यांनी ऊस, फळबागा, जनावरांचा चारा आणि पिण्याचे पाणी याचे नियोजन करावे.

---

## गहू काढणीस इंदापूरात वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इंदापूर :** इंदापूर तालुक्यातील गव्हाचे पीक परिपक्व अवस्थेत आले असून सध्या गहू काढणीच्या कामाला वेग आला आहे. मजूर टंचाईमुळे शेतकरी हार्वेस्टरच्या साह्याने गहू काढणी करण्याकडे मोठ्या प्रमाणावर वळले आहेत. तालुक्यात सध्या मजुरांची कमतरता जाणवत असल्याने शेतकऱ्यांनी पंजाबहून हार्वेस्टर मागविले आहेत. त्यामुळे अनेक गावांमध्ये हार्वेस्टरच्या माध्यमातून गहू काढणी सुरू झाली असून काढणीच्या कामाला वेग आला आहे. सध्या एका एकर गहू काढणीसाठी हार्वेस्टरचा दर साधारणपणे अडीच हजार ते तीन हजार रुपयांपर्यंत आहे. मजुरांकडून गहू काढणी, मळणी व इतर कामांचा खर्च जास्त होत असल्याने शेतकरी हार्वेस्टरचा पर्याय अधिक सोयीचा असल्याचे सांगत आहेत.

---

## आंबेगाव तालुक्यात दुसरा बिबट पिंजऱ्यात जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील भराडी येथे वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात दुसरा बिबट (मादी) जेरबंद झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून परिसरात दहशत निर्माण करणारा हा बिबट्या जेरबंद झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. तरीही, अजूनही एक बिबट्या परिसरात वावरत असल्याचे स्थानिक शेतकरी सांगत आहेत.

भराडी येथील वखारवाडी जवळ जितेंद्र गोरक्ष गावडे यांच्या रिव्हिलर जातीच्या कुत्र्याचा बिबट्याने शीकार केल्याने वनविभागाने त्या ठिकाणी पिंजरा लावला होता. या पिंजऱ्यात १ मार्च रोजी एक बिबट्या जेरबंद झाला होता. मात्र, त्याचवेळी पिंजऱ्याच्या बाहेर दुसरा बिबट्या बसलेला शेतकऱ्यांनी पाहिला होता. तसेच दुपारी महिला जवळच्या शेतात कांदा खुरपणी करत असताना दोन बिबटे हत्ती गवताच्या शेतात दिसले होते.

स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार वन विभागाने पुन्हा पिंजरा लावला, आणि ३ मार्च रोजी रात्री एक मादी बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाली. या ठिकाणी आतापर्यंत एक मादी व एक बिबट असा दोन बिबटे जेरबंद झाले आहेत.

तरीही अजूनही एक बिबट्या परिसरात वावरत असल्याचे स्थानिक शेतकरी सांगत आहेत. जितेंद्र गावडे यांनी वनविभागाने उर्वरित बिबट्याला पकडण्यासाठी देखील पिंजरा लावावा, अशी मागणी केली आहे.

---

### चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी विशेष मोहीम

# डीपी चोर पकडून द्या; २१ हजारांचे बक्षीस जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** खेड तालुक्यात शेतातील वीज रोहित्र (डीपी) चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर डीपी चोरी करणाऱ्या टोळीची माहिती देणाऱ्यास किंवा चोर पकडून देण्यास मदत करणाऱ्यास २१ हजार रुपयांचे रोख बक्षीस देण्याची घोषणा खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा पिंपळगाव तर्फे खेड गटाचे जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे पाटील यांच्या समर्थकांनी केली आहे. ही मोहीम समर्थ फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येत असून तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

खेड तालुक्यात शेतातील डीपी चोरीचे प्रमाण गेल्या काही काळात वाढले आहे. साधारणपणे पाच ते दहा लाख रुपये किमतीच्या डीपीमधून चोरटे केवळ पंचवीस ते तीस हजार रुपयांच्या तांब्याच्या वायर साठी संपूर्ण यंत्रणेचे नुकसान करतात. परिणामी वीजपुरवठा खंडित होऊन ऐन हंगामात पिकांना पाणी देता येत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

या पार्श्वभूमीवर चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी आणि चोरट्यांना जरब बसवण्यासाठी विजयसिंह शिंदे पाटील व समर्थ फाउंडेशनच्या वतीने विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेनुसार डीपी चोरी करणाऱ्या टोळीबाबत ठोस माहिती देणाऱ्यास किंवा चोर पकडून देण्यास मदत करणाऱ्यास २१ हजार रुपयांचे रोख बक्षीस देण्यात येणार असून माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. परिसरात संशयास्पद हालचाली दिसल्यास किंवा कोणी डीपीची छेडछाड करताना आढळल्यास त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन सोमनाथ टोपे यांनी केले आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मरकळ व परिसरातील शेतकऱ्यांनी दोन दिवसांपूर्वी महावितरणच्या राजगुरुनगर कार्यालयावर तसेच खेड पोलिस ठाण्यावर धडक मोर्चा काढून डीपी चोरीच्या घटनांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली होती. आता बक्षीस जाहीर केल्यामुळे या चोरीच्या घटनांवर काही प्रमाणात आळा बसतो का, याकडे तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

---

## धामणीकरांचे एकदिवसीय लाक्षणिक उपोषण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** धामणी (ता. आंबेगाव) तालुक्याच्या पूर्व भागातील सात ते आठ गावे शेतीसाठी वंचित राहिल्याने शेतकऱ्यांनी वीज पुरवठा न केल्याच्या धोरणाविरुद्ध लाक्षणिक एकदिवसीय उपोषणाचे पाऊल उचलले आहे.

शेतकऱ्यांनी स्वखर्चाने तीन किलोमीटर अंतरावरून पाणीपुरवठ्यासाठी पाईपलाईन राबवली असून त्यासाठी जमिनी, घरे, दागदागिने गहाण ठेवून ग्रामीण, शहरी पतसंस्था, सहकारी व राष्ट्रीयकृत बँकांकडून सुमारे सात ते आठ कोटी रुपये कर्ज घेऊन योजना राबवली. मात्र शासनाच्या असहकारामुळे वीज कनेक्शन न मिळाल्याने या शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.

उपोषणात माजी पंचायत समिती सदस्य रवींद्र करंजखेले, माजी सरपंच अंकुश भूमकर, माजी सरपंच सागर जाधव, विद्यमान सरपंच अक्षय विधाटे, माजी सरपंच रेश्मा बोऱ्हाडे, भाऊसाहेब करंडे, पहाडदरा गावचे सरपंच मच्छिंद्र वाघ, महेश वाघ, सोपान वायकर, प्रतीक जाधव, वामन जाधव, दीपक जाधव, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन, सर्व ग्रामपंचायत सदस्यनी सहभागी होत उपोषणाच्या माध्यमातून आपला निषेध व्यक्त केला.

## सारांश वृत्त

### चालत्या ट्रेनमधून पडून महिलेचा मृत्यू

**बरेली (उत्तर प्रदेश):** बरेलीला परतत असताना चालत्या ट्रेनमधून पडून एका ३५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला, असे पोलिसांनी शुक्रवारी सांगितले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, गुरुवारी रुखसाना तिच्या जोडीदार सद्दामसोबत कासगंज-रामनगर पॅसेंजर ट्रेनने प्रवास करत असताना आणि बदायूंहून बरेलीला परतत असताना ही घटना घडली. महिला खाली पडली व तिच्या अंगावरून ट्रेन गेल्याने तीचा मृत्यू झाला.

### निवृत्ती लाभांवर १००० कोटींचा खर्च

**हैदराबाद** : तेलंगणाचे मुख्यमंत्री ए रेवंत रेड्डी यांनी सांगितले की, राज्य सरकार निवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्ती लाभासाठी सरासरी दरमहा १,००० कोटी रुपये देत आहे. तेलंगणा मडिगा कर्मचारी समन्वय समितीच्या बैठकीत बोलताना रेड्डी म्हणाले की, अनुसूचित जाती उपवर्गीकरण लागू करण्यात तेलंगणा हे देशातील उर्वरित भागांसाठी एक आदर्श राज्य आहे. दरमहा सुमारे १,००० सरकारी कर्मचारी निवृत्त होत आहेत. जर एक कर्मचारी निवृत्त झाला तर सरकारला निवृत्त कर्मचाऱ्याला देय असलेला १ कोटी रुपये खर्च करावा लागतो. त्यामुळे निवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्ती लाभ म्हणून सुमारे १,००० कोटी रुपये दिले पाहिजेत. आर्थिक भार असला तरी, आम्ही व्यवस्थापन कसे तरी करत आहोत," असे ते म्हणाले.

### अरुणाचलमध्ये सात विधेयके सादर

**इटानगर** : अरुणाचल प्रदेश विधानसभेत शुक्रवारी तब्बल सात महत्त्वाची विधेयके सादर करण्यात आली. गृहमंत्री मामा नाटुंग यांनी अरुणाचल प्रदेश अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा विधेयक सादर केले, जे राज्यातील इमारती आणि परिसरात अग्निशमन आणि आपत्कालीन सेवांच्या देखभालीची तरतूद करते आणि आग प्रतिबंधक आणि सुरक्षा उपायांसाठी तरतुदी मजबूत करते. शिक्षण मंत्री पासांग दोर्जी सोना यांनी अरुणाचल प्रदेश शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांचे हस्तांतरण आणि नियुक्ती (नियमन आणि व्यवस्थापन) विधेयक सादर केले.

## मतदार यादीतील कथित अनियमिततेवरून

# ममता बॅनर्जी यांचे कोलकात्यात धरणे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटले असून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शुक्रवारी (६ मार्च) कोलकाता येथे धरणे आंदोलन सुरू केले. राज्यातील मतदार यादीत मोठ्या प्रमाणात नावे वगळल्याचा आरोप करत त्यांनी भारतीय निवडणूक आयोगाविरोधात थेट संघर्षाची भूमिका घेतली आहे.

निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांच्या नियोजित राज्य भेटीपूर्वीच हे आंदोलन सुरू करण्यात आल्याने या प्रशासकीय प्रक्रियेला स्पष्टपणे राजकीय स्वरूप प्राप्त झाले आहे.

सत्ताधारी तृणमूल काँग्रेसने आरोप केला आहे की अलीकडील पुनरावृत्ती प्रक्रियेदरम्यान मतदार यादीतून मोठ्या प्रमाणावर नावे वगळण्यात आली आहेत.



पक्षाच्या मते सुमारे ६३ लाखांहून अधिक मतदारांची नावे यादीतून हटवण्यात आली असून त्यातील अनेक वगळणे अनियमित किंवा अस्पष्ट असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

पक्षाचे नेते असा दावा करीत आहेत की या प्रक्रियेमुळे मोठ्या संख्येने पात्र मतदार प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेपासून दूर राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी हा मुद्दा केवळ पक्षीय राजकारणाचा नसून लोकशाहीतील मतदानाच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याचा प्रश्न असल्याचे सांगितले. सार्वजनिक धरणे आंदोलनाद्वारे त्या मतदारांच्या सहभागावर गंभीर परिणाम होऊ शकतो या भीतीकडे राष्ट्रीय स्तरावर लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहेत.

निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांच्या नियोजित भेटीपूर्वीच आंदोलन सुरू करण्याचा निर्णय हा पुनरावृत्ती प्रक्रियेची अधिक सखोल तपासणी व्हावी आणि वगळण्यात आलेल्या नावांचा आढावा घ्यावा यासाठी आयोगावर दबाव आणण्याचा प्रयत्न मानला जात आहे.

पश्चिम बंगालसारख्या अत्यंत स्पर्धात्मक राजकीय राज्यात मतदार यादी हा नेहमीच संवेदनशील विषय राहिला आहे. अनेक मतदारसंघांमध्ये विजयाचा फरक तुलनेने कमी असल्याने मतदारसंख्येतील लहान बदलही निवडणुकीच्या निकालांवर परिणाम करू शकतात. तृणमूल काँग्रेसच्या मते, यादीतून वगळण्यात आलेल्या नावांमध्ये अल्पसंख्याक समाज तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे प्रमाण अधिक असण्याची शक्यता आहे. हे घटक पक्षाच्या पारंपरिक मतदारवर्गाचा मोठा भाग असल्याने या मुद्द्याला स्पष्ट राजकीय परिमाण मिळत आहे.

दुसरीकडे निवडणूक आयोगाने मतदार यादीतील सुधारणा ही नियमित आणि आवश्यक प्रक्रिया असल्याचे स्पष्ट केले आहे.

आयोगाच्या मते या प्रक्रियेचा उद्देश दुबार नोंदी हटवणे, मृत मतदारांची नावे काढणे आणि स्थलांतरित झालेल्या नागरिकांची नोंद अद्ययावत करणे हा असतो. मात्र तृणमूल काँग्रेसने नमूद केलेल्या वगळण्याच्या मोठ्या आकड्यामुळे या प्रक्रियेच्या पारदर्शकता आणि अचूकतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

## ऊर्जा पुरवठा अखंडित ठेवण्यासाठी प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन भारत सरकारने स्वयंपाकाच्या गॅसचा अखंड पुरवठा राखण्यासाठी महत्त्वाची पावले उचलली आहेत. पश्चिम आशियातील संघर्षामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची भीती व्यक्त होत असताना सरकारने रिफायनरी कंपन्यांना द्रवीकृत पेट्रोलियम गॅसचे उत्पादन वाढवण्याचे निर्देश दिले आहेत.

निर्देशानुसार पेट्रोलियम मंत्रालयाने रिफायनर्सना प्रोपेन आणि ब्युटेन या घटकांचा वापर वाढवून एलपीजीचे उत्पादन वाढवण्यास सांगितले आहे. येत्या काही आठवड्यांत देशातील कुटुंबांना स्वयंपाकाच्या गॅसची कोणतीही कमतरता भासू नये, यासाठी हे पाऊल उचलण्यात आल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जहाज वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ही सामुद्रधुनी जागतिक ऊर्जा वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग मानली जाते. या मार्गावर अडथळे निर्माण झाल्यास जगभरातील ऊर्जा पुरवठ्यावर मोठा परिणाम होऊ शकतो. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा एलपीजी खरेदीदार आहे. भारतात वापरल्या जाणाऱ्या एलपीजीपैकी ९० टक्क्यांहून अधिक पुरवठा पश्चिम आशियातून आयात केला जातो. एलपीजी हे देशातील कोट्यवधी घरांमध्ये स्वयंपाकासाठी वापरले जाणारे अत्यावश्यक इंधन असल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. सार्वजनिक हित लक्षात घेऊन त्याचा अखंड पुरवठा सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. या इंधनाचा पुरवठा खंडित झाला तर त्याचा थेट परिणाम देशातील लाखो कुटुंबांवर होऊ शकतो.

# रशियन तेल खरेदीची भारताला मुभा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : अमेरिकेने भारतीय रिफायनरीजना रशियन कच्चे तेल खरेदी करण्यासाठी तात्पुरती ३० दिवसांची सूट जाहीर केल्यानंतर या निर्णयावर देशातील राजकारण तापले आहे. सत्ताधारी भाजपने या घडामोडीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील धोरणात्मक तेल कूटनीतीचे यश म्हटले असून, हा निर्णय काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्या टीकेला मोठे उत्तर असल्याचा दावा केला आहे.

अमेरिकेच्या या निर्णयानंतर भाजपने काँग्रेसवर तेल टंचाईबाबत भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा आरोप केला. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी सोशल मीडियावर प्रतिक्रिया देताना काँग्रेस आणि राहुल गांधी यांनी तेलाच्या कमतरतेबाबत खोट्या बातम्या पसरवून जनतेत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली संयम आणि स्पष्ट धोरण ठेवत ऊर्जा सुरक्षेच्या बाबतीत योग्य पावले उचलली असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, इराणशी वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसेंट यांनी गुरुवारी या सूटीची घोषणा केली. त्यांनी सांगितले की अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्या ऊर्जा धोरणामुळे अमेरिकेत तेल आणि वायू उत्पादनाने विक्रमी पातळी गाठली आहे. जागतिक बाजारात ऊर्जा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी भारतीय रिफायनरीजना रशियन तेल खरेदी करण्यासाठी ३० दिवसांची परवानगी देण्यात येत आहे.

बेसेंट यांनी सांगितले की भारत हा अमेरिकेचा महत्त्वाचा भागीदार आहे आणि नवी दिल्लीकडून अमेरिकन तेलाची खरेदी वाढेल अशी अपेक्षा आहे. ही अंतरिम सूट देण्यामागे जागतिक ऊर्जा पुरवठा खंडित करण्याच्या इराणच्या प्रयत्नांमुळे निर्माण होणारा दबाव कमी करण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.

# ओम बिर्ला यांच्या ठरावावर चर्चा हवीच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पदावरून हटविण्याची मागणी करणारा ठराव पुढील आठवड्यात सभागृहात मांडला जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने शुक्रवारी स्पष्ट केले की, हा प्रस्ताव संसदीय नियम आणि परंपरांचे पालन करूनच आणण्यात आला असून सभापतींच्या कथित "पक्षपाती वर्तनाची" ठोस उदाहरणे विरोधी पक्षांच्या खासदारांनी दिली आहेत. त्यामुळे या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा होणे आवश्यक असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याला ९ मार्च रोजी सुरुवात होत असून त्या दिवशी लोकसभेत बिर्ला यांना पदावरून काढून टाकण्याचा प्रस्ताव विचारार्थ घेतला जाऊ शकतो. विरोधी पक्षांनी सभापतींनी कामकाज चालवताना "स्पष्टपणे पक्षपाती भूमिका" घेतल्याचा आरोप केला आहे. काँग्रेसचे सरचिटणीस (संचार) जयराम रमेश यांनी सांगितले की, तृणमूल काँग्रेस वगळता इतर सर्व प्रमुख विरोधी पक्षांनी या ठरावाला पाठिंबा दिला आहे.

रमेश म्हणाले, "तृणमूल काँग्रेस वगळता सर्व विरोधी पक्षांनी सभापतींना हटविण्याच्या प्रस्तावावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. एकूण ११८ विरोधी खासदारांनी या सूचनेवर स्वाक्षरी केली आहे. आता हा विषय ९ मार्च रोजी सभागृहात चर्चेसाठी येतो का, ते पाहावे लागेल."

त्यांनी पुढे सांगितले की, हा प्रस्ताव संसदीय लोकशाहीतील एक नियमित आणि वैधानिक प्रक्रिया आहे. "ही लोकशाहीची साधने आहेत. आम्ही नियम आणि परंपरेनुसार प्रस्ताव दिला आहे. यापूर्वीही अशा घटना घडल्या आहेत. उदाहरणार्थ १९५४ साली केवळ ५० सदस्यांचा एकत्रित विरोधी पक्ष असताना आणि ४८९ सदस्यांच्या सभागृहात काँग्रेसचे ३६४ खासदार असतानाही तत्कालीन सभापती जी. व्ही. मावळणकर यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्यात आला होता," असे त्यांनी सांगितले. विरोधी सदस्यांवर वारंवार खोटे आरोप केले जात असल्याचा त्यांचा आरोप आहे. "आम्ही संदर्भासह उदाहरणे दिली आहेत. या मुद्द्यावर संसदेतील चर्चा होणे आवश्यक आहे," असे त्यांनी म्हटले. हा प्रस्ताव सभागृहात चर्चेसाठी स्वीकारला गेला, तर लोकसभेत एक दुर्मिळ परिस्थिती निर्माण होईल. त्या वेळी सभापती ओम बिर्ला सभागृहात उपस्थित राहतील; मात्र ते कामकाजाचे अध्यक्षस्थान भूषवू शकणार नाहीत.

# नागरी सेवा परीक्षेत अनुज अग्निहोत्री अव्वल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) शुक्रवारी नागरी सेवा परीक्षा २०२५ चा अंतिम निकाल जाहीर केला असून अनुज अग्निहोत्री यांनी देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. राजेश्वरी सुवे एम यांनी दुसरा तर आकांश धुल यांनी तिसरा क्रमांक मिळवला आहे. आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, एकूण ९५८ उमेदवारांनी ही प्रतिष्ठेची परीक्षा उत्तीर्ण केली असून विविध केंद्रीय नागरी सेवांमध्ये नियुक्तीसाठी त्यांच्या नावांची शिफारस करण्यात आली आहे.

भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस), भारतीय परराष्ट्र सेवा (आयएफएस) आणि भारतीय पोलिस सेवा (आयपीएस) यांसारख्या उच्च पदस्थ सेवांसाठी अधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी यूपीएससीकडून दरवर्षी नागरी सेवा परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा तीन टप्प्यांत घेतली जाते. त्यामध्ये प्राथमिक परीक्षा, मुख्य लेखी परीक्षा आणि मुलाखत या टप्प्यांचा समावेश असतो. या सर्व टप्प्यांमधील कामगिरीच्या आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाते. आयोगाने जाहीर केलेल्या निवेदनानुसार, शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांपैकी ३४८ उमेदवारांची उमेदवारी तात्पुरती ठेवण्यात आली आहे. आवश्यक कागदपत्रांची पडताळणी आणि इतर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या नियुक्तीबाबत पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

केंद्र सरकारने यावर्षी नागरी सेवा परीक्षेद्वारे भरण्यासाठी एकूण १,०८७ रिक्त पदांची नोंद केली होती. या पदांमध्ये विविध केंद्रीय सेवांचा समावेश असून अंतिम नियुक्ती सेवा प्राधान्य, गुणवत्ता क्रमांक आणि आरक्षण धोरणानुसार केली जाणार आहे.

## पश्चिम आशियातील संघर्षावर संसदेत चर्चा व्हावी

# काँग्रेसने केली मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा पुढील आठवड्यात सुरू होणार असून पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर या विषयावर संसदेत अल्पकालीन सविस्तर चर्चा घेण्याची मागणी काँग्रेसने केली आहे. सरकारने केवळ निवेदन देणे पुरेसे नसून या गंभीर परिस्थितीवर संसदेच्या दोन्ही सभागृहांत चर्चा होणे आवश्यक असल्याचे काँग्रेसने स्पष्ट केले आहे.

काँग्रेसचे सरचिटणीस (संचार) जयराम रमेश यांनी पीटीआयशी बोलताना सांगितले की अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा ९ मार्चपासून सुरू होऊन २ एप्रिलपर्यंत चालणार आहे. हा कालावधी सुमारे २५ दिवसांचा असला तरी प्रत्यक्षात फक्त १७ बैठकांचे नियोजन आहे. या काळात विनियोजन विधेयक, वित्त विधेयक तसेच काही मंत्रालयांच्या कामकाजावर चर्चा होणार आहे. मात्र त्याचवेळी पश्चिम आशियातील संघर्ष, भारत-अमेरिका व्यापार करार, रशियाकडून भारताच्या तेल खरेदीवर अमेरिकेकडून सुरू असलेला दबाव असे अनेक महत्त्वाचे विषयही आहेत.



त्यामुळे या परिस्थितीवर संसदेत चर्चा होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

रमेश यांनी आरोप केला की नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार आंतरराष्ट्रीय पातळीवर कमकुवत होत चालले आहे. भारताची जागतिक स्थिती पूर्वीपेक्षा कमकुवत दिसत असून भारताला केवळ अमेरिका समोरच नव्हे तर इस्रायल समोरही दुय्यम स्थान दिले जात असल्याची भावना निर्माण होत असल्याचा दावा त्यांनी केला.

त्यांच्या मते पश्चिम आशियातील संघर्ष भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. कारण या प्रदेशात जवळपास १ कोटी भारतीय काम करतात. त्यामुळे त्यांची सुरक्षितता, रोजगार आणि उपजीविका यावर थेट परिणाम होऊ शकतो. याशिवाय या प्रदेशातून भारतात दरवर्षी सुमारे ५० ते ६० अब्ज डॉलर्स इतकी परदेशी रक्कम येते. त्यामुळे हा केवळ परराष्ट्र धोरणाचा प्रश्न नसून आर्थिक दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असल्याचे त्यांनी सांगितले.

सरकारने या विषयावर स्वतःहून निवेदन देण्याची शक्यता व्यक्त होत असली तरी ते पुरेसे ठरणार नाही, असे रमेश म्हणाले. मंत्री येऊन निवेदन देतात आणि त्यानंतर कोणतेही प्रश्न विचारण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे केवळ निवेदन देण्याऐवजी संसदेत पूर्ण अल्पकालीन चर्चा व्हावी, अशी काँग्रेसची मागणी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पश्चिम आशियातील घडामोडींविषयी बोलताना त्यांनी सांगितले की अमेरिका आणि इस्रायल यांनी इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. त्यानंतर इराणकडून आखाती देशांतील अमेरिकन लष्करी तळांवर हल्ले झाल्याने तणाव आणखी वाढला आहे. हिंदी महासागर परिसरात अमेरिकन नौदलाच्या हालचालीही वाढल्या असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

# कर्नाटकात १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया बंदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बंगळुरू** : कर्नाटक सरकारने २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर करत १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्याचा प्रस्ताव मांडला आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी शुक्रवारी राज्य विधानसभेत अर्थसंकल्प सादर करताना ही घोषणा केली. या निर्णयामुळे देशभरात चर्चेला उधाण आले असून वयानुसार सोशल मीडिया वापरावर निर्बंध आणणारे कर्नाटक हे पहिले राज्य ठरण्याची



शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्य सरकारकडून मिळालेल्या माहितीनुसार, विद्यापीठांच्या कुलगुरू आणि शिक्षणतज्ज्ञांशी झालेल्या चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. अल्पवयीन मुलांमध्ये वाढत चाललेले सोशल मीडियाचे व्यसन, हानिकारक किंवा अयोग्य आशयाचा संपर्क तसेच त्यातून निर्माण होणाऱ्या वर्तनात्मक समस्या याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली होती. त्यानंतर १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया वापर मर्यादित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

अर्थसंकल्पीय भाषणात या निर्णयाची घोषणा करण्यात आली असली तरी त्याची अंमलबजावणी कशी होणार, कोणत्या प्लॅटफॉर्मवर निर्बंध लागू होतील आणि त्यासाठी कोणती नियंत्रण यंत्रणा वापरण्यात येणार याबाबतची सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे पुढील धोरणात्मक दस्तऐवजांत जाहीर केली जाणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

मानसिक आरोग्य तज्ज्ञ आणि शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांच्या मते, आजच्या काळात शालेय शिक्षण, अभ्यासाचे साहित्य, मित्रांशी संवाद तसेच दैनंदिन उपक्रमांसाठी किशोरवयीन मुले डिजिटल साधनांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात. त्यामुळे पूर्ण बंदी घालण्याऐवजी संतुलित आणि टप्प्याटप्प्याने नियमन करण्याची गरज आहे.

## काश्मिर खोऱ्यात इंटरनेट बंद

**श्रीनगर : इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्या हत्येनंतर काश्मीरमध्ये उसळलेल्या संताप आणि आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर चौथ्या दिवशीही प्रशासनाने कडक खबरदारीचे उपाय कायम ठेवले आहेत. संभाव्य अशांतता रोखण्यासाठी काश्मीर खोऱ्यातील अनेक संवेदनशील भागांमध्ये निर्बंध लागू ठेवण्यात आले आहेत. प्रशासनाने परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी शिक्षण संस्थांनाही बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.**

## गुजरातमध्ये ३७ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद** : राज्यातील पोलिस प्रशासन अधिक सक्षम आणि कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने गुजरात सरकारने मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय फेरबदल केले आहेत. राज्याच्या गृह विभागाने तब्बल ३७ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या जाहीर केल्या असून या निर्णयामुळे पोलिस यंत्रणेत धोरणात्मक पोस्टिंग, पदोन्नती आणि प्रशासकीय रचनेत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.

या फेरबदलामुळे अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या बदलल्या असून काही पदांची श्रेणीसुधारणा करण्यात आली आहे. तसेच काही ठिकाणी नवीन प्रशासकीय रचना तयार करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्था व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

या बदलांच्या केंद्रस्थानी वरिष्ठ आयपीएस अधिकारी निर्लिप्ता राय यांची बदली आहे. त्यांना राज्य देखरेख कक्षातून हलवून राजकोट रेंजच्या आयजीपदी नियुक्त करण्यात आले आहे. राज्यातील दारूबंदी अंमलबजावणी आणि पाळत ठेवण्याच्या व्यवस्थेत नेतृत्वात बदल करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

या मोठ्या फेरबदलामुळे गुजरातमधील पोलिस प्रशासनाची रचना अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे. या बदलांचा परिणाम राज्यातील कायदा व सुव्यवस्था व्यवस्थेवर पुढील काळात दिसून येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


## विभागलेल्या समाजांवरच हल्ले होत असल्यामुळे एकतेचे महत्त्व अधोरेखित

# सरसंघचालक मोहन भागवत यांचे एकतेचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जैसलमेर** : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी समाजातील एकता आणि सद्भावनेचे महत्त्व अधोरेखित करताना, समाज विभागलेला असेल तरच त्यावर हल्ले होतात, असे मत व्यक्त केले. राजस्थानातील जैसलमेर येथे जैन समाजाच्या एका महोत्सवादरम्यान ते बोलत होते. युद्धे आणि संघर्ष आजही सुरू आहेत, कारण मानव समाजाने आपली आंतरिक एकता विसरली आहे, असे त्यांनी नमूद केले.

भागवत म्हणाले की जगभरात दिसणाऱ्या संघर्षांचे मूळ कारण म्हणजे समाजाने स्वतःची एकात्मता



ओळखली नाही. समुदायांमधील वाढत्या विभाजनामुळे युद्धे आणि तणाव कायम राहतात. आपण वेगवेगळे दिसत असलो तरी मुळात आपण सर्व एकच आहोत, हे सत्य लोक विसरत आहेत, असेही त्यांनी सांगितले. जैन समुदायाच्या धार्मिक कार्यक्रमात एकता आणि परस्पर सद्भावनेचा संदेश देण्याचा प्रयत्न त्यांनी यावेळी केला.

जागतिक परिस्थितीवर भाष्य करताना भागवत यांनी आंतरराष्ट्रीय संस्थांवरही भाष्य केले. पहिल्या महायुद्धानंतर दुसरे महायुद्ध टाळण्यासाठी राष्ट्रसंघ स्थापन करण्यात आला होता; मात्र तो अयशस्वी ठरला आणि त्यानंतर दुसरे महायुद्ध घडले, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ स्थापन झाला, परंतु सध्याच्या परिस्थितीत ही संस्था देखील प्रभावीपणे कार्य करताना दिसत नाही, अशी टीकाही त्यांनी केली. आज अनेक युद्धे सुरू असून ती थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत, असे ते म्हणाले. हल्ले का होतात, असा प्रश्न उपस्थित करत भागवत म्हणाले की मानवी समाज आपली एकता आणि अखंडता ओळखू शकत नसल्यामुळे संघर्ष निर्माण होतात. आजच्या काळात समाज, धर्म आणि देशांच्या पातळीवर स्पर्धा वाढली आहे. आपण विभागलेले असल्यामुळेच आपल्यावर हल्ले होतात. समाज एकसंध आणि जागरूक असेल तर बाह्य हल्ल्यांना तोंड देणे अधिक सोपे होते, असे त्यांनी स्पष्ट केले. देश आणि समाजासाठी स्वार्थ बाजूला ठेवण्याचे आवाहन करताना त्यांनी सांगितले की आपण भेदभाव आणि स्वार्थ सोडून दिला आणि देशासाठी जगण्यास तसेच आवश्यक असेल तर मरण्यास तयार झालो, तर समाज अधिक मजबूत बनेल. अशा समाजातून सर्व संघर्ष संपुष्टात येतील. भारत केवळ समृद्ध देश बनणार नाही, तर जगाला नवे, आनंदी आणि सुंदर भविष्य देणारा जागतिक नेता म्हणून उदयास येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वाद मिटविण्याचा मार्ग काय, याबाबत बोलताना त्यांनी सांगितले की संघर्ष, तडजोड किंवा वाद हा उपाय नाही. खरा उपाय म्हणजे सद्भावना. समाजामध्ये परस्पर विश्वास आणि सद्भावना निर्माण झाल्याशिवाय कोणत्याही समस्येचे दीर्घकालीन समाधान मिळू शकत नाही. त्यामुळे संपूर्ण समाजाला हळूहळू या मूल्यांसाठी तयार करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

सर्व संघर्ष संपवण्यासाठी समाजाने एकत्र उभे राहिले पाहिजे. धर्माचे रक्षण करण्यासाठी समानतेवर आधारित समाजव्यवस्था आवश्यक आहे. अशा समाजात जगातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या श्रद्धा, परंपरा आणि स्वभावानुसार आध्यात्मिक प्रगतीचा मार्ग सापडेल, असे त्यांनी सांगितले.